मुख्य लेखा परीक्षक,
स्थानिक निधी लेखा,
महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
कोकण भवन सहावा माळा,
नवी मुंबई- 400 614.
दिनांक :- २६|८|२००२

## कार्यालयीन आदेश क्रमांक 23

विषय :- जिल्हा परिषदांना देण्यात येणा-या आस्थापना अनुदानाचे लेखा परिक्षणाबाबत. कोषाका-1001/प्र.क्र.54/कोषा-4 दि.29 मार्च 2001

संदर्भ :- 1) वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक कोषा-प्र5 दि.11 मे 2001.
2) कोषाका-1001/प्र.क्र.54/कोषा-5 दि.19 सप्टेंबर 2001.
3) कोषाका-1001/प्र.क्र.54/कोषा-5 दि.30 मार्च 2002
4) कोषाको-1001/प्र.क्र.54/कोषा-5 दि.30 मार्च 2002 (as printed)
5) संचालक लेखा व कोषागारे यांचे पत्र क्र.कोष-1422/जिप वेतन /अनुदान/प्र.क्र.44/2/कोषागार/4306 दि.12 जुलै 2002.

जिल्हा परिषदांना वेतन/ आस्थापना अनुदान व योजना अनुदान एकत्रितरित्या अर्थोपाय अग्रिमाद्वारे देण्याची पद्धत आर्थिक वर्ष 2001-2002 पासून सुधारीत करण्यात आली आहे. या आर्थिक वर्षापासून वेतन/आस्थापना अनुदान कोषागारातून स्वतंत्ररित्या देण्यात येत आहे. संबंधित प्रशासकीय विभागांनी आस्थापना अनुदान " कोषागारातून देय " अशी स्वतंत्र तरतुद अर्थ संकल्पात केलेली आहे. प्रशासकीय विभागांनी जिल्हा परिषदांना मंजूर तरतुदीचे अधिन वितरण केल्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यानाही रक्कम सहाय्यक अनुदान देयकाच्या स्वरुपात नमुना 44 वर कोषागारातून काढावयाची आहे. कोषागारातून आस्थापना अनुदानाची रक्कम आहरीत करताना ती मासिक सरासरीच्या आधारे काढावी अशा सुचना संदर्भांकित शासन निर्णय अनुक्रमांक 4 नुसार दिलेल्या आहेत. या संदर्भात पुढील आदेश देण्यात येत आहेत.

1) आस्थापना अनुदानातून प्रामुख्याने वेतन/प्रवासभत्ता व कार्यालयीन खर्च या हेतुसाठी खर्च करावयाचा आहे. वेतनावरील खर्च हा शासनाने मंजूर केलेल्या पद संख्येनुसार करण्यात येत आहे याची तपासणी चालु लेखा परीक्षण सन 2001-2002 पासून करण्यात यावी. मंजूर नसलेल्या पदांवर वेतन अनुदान खर्च केले असल्यास तसे लेखा परीक्षण अहवालात नमूद करण्यात यावे.

2) आस्थापना अनुदानाची मागणी नियंत्रक अधिका-यांकडे नोंदविताना अर्थसंकल्प नियमावलीनुसार केलेली आहे किंवा कसे याची तपासणी करावी.

3) आर्थिक वर्ष सन 2001-2002 संपलेले असल्याने आस्थापना अनुदानाच्या अखर्चित रकमा जमा केल्या नसल्यास तसे लेखा परीक्षण अहवालात नमुद करावे व या रकमा कोषागारात जमा होतील असे पहावे. तसेच सदर बाब अर्धशासकीय पत्राद्वारे मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी.

4) चालू वित्तीय वर्षात कोषागारातून रकमा मासिक खर्चाच्या आधारे काढल्या नसल्यास तसे लेखा परीक्षण अहवालात नमूद करावे.

5) आस्थापना अनुदानाची मागणी अवास्तव केली असल्यास त्याबाबतही लेखा परीक्षण अहवालात आक्षेप नमूद करण्यात यावा.

कृ.मा.प.